Golden Research Thoughts
ISSN 2231-5063

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 3 | Sept - 2015





# महात्मा गांधी : राजनिती

**प्रा.मल्लिनाथ अंजुनगीकर**
**लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर.**

**प्रस्तावना:**

महात्मा गांधीजींचे जीवन कार्य, त्यांची विचार यांचा विचार करता त्यांचे श्रेष्ठत्त्व निर्विवाद स्पष्ट होते. लोकमान्य टिळकांचा मृत्युनंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीची सुत्रे त्यांच्या हाती आली. अल्पकाळातच त्यांनी आपल्या नेतृत्त्वांनी भारतातच नव्हे तर संपुर्ण जगामध्ये स्वतःचे वेगळे असे स्थान निर्माण केले. कार्लमार्क्सप्रमाणे त्यांनी आपले विचार सुत्रबध्दरित्या एखाद्या ग्रंथात लिहून ठेवले नाही. मात्र त्यांनी आपल्या कृतीतून आणि विचारातून एक आदर्श जीवनप्रणाली मांडली होती. मानवता वादी विचार प्रकट केले होते. त्यांनी मुल्याधिष्ठीत जीवनपध्दतीचा स्विकार केला होता, नव्हे मुल्याधिष्ठीत जीवनपध्दतीचा आदर्श म्हणूनच त्यांचा उल्लेख करावा लागतो. सत्य आणि अहिंसा या दोन डगरीवर त्यांनी स्वतःचा जीवनाची व कार्याची उभारणी जाणीवपूर्वक केली होती. गांधीजीनी हे विचार आपण पहिल्यांदा सांगतो असा दावा ही केला नाही. सॉक्रेटिस ते रस्किनपर्यंत अनेक विचारवंतांनी या तत्त्वाचा पुरस्कार केला होता. मात्र या तत्त्वावर राजकारण, विशेषतः स्वातंत्र्य लढयाचे आंदोलन उभे राहू शकेल असा विचार कोणीही मांडला नव्हता. महात्मा गांधींनी तो सर्वप्रथम मांडला आणि प्रत्यक्षात ही आणला.

त्यांनी राजकारण नैतिकतेवर अधिष्ठित असावे असे विचार मांडले. जगप्रसिध्द इटालियन विचारवंत निकोलो मॅकियाव्हेली यांनी राजकारण आणि नैतिकता यांच्यात भिन्नता आहे हे सांगताना असे म्हटले आहे की, आपले साध्य योग्य असेल तर साधनांनाही योग्य आणि उचित मानले जाईल. प्राचीन भारतीय राजकीय विचारवंत कौटिल्याच्या राजकीय विचाराशी मॅकियाव्हेलीचे विचार हे मिळते जुळते आहेत असे दिसतात. कारण कौटिल्यानेही धर्म आणि नीती यापासून राजकारण अलिप्त असले पाहिजे असे म्हटले आहे. त्याच्या मते नीती आणि धर्म राज्याच्या सुरक्षिततेवर आणि अंतर्गत सुव्यवस्थेवरच अवलंबुन असतात. म्हणून त्यांचे स्थानही राजकारणापेक्षा कमी महत्त्वाचे असून राजधर्म हा धर्म आणि नीतीपेक्षा श्रेष्ठ आहे.



मात्र याउलट म.गांधीजींच्या विचारप्रणात शुध्द नीतीचे प्रामाणिकपणे पालन करणे आणि अध्यात्मपरायण होणे यांना परमोच्च स्थान आणि महत्त्व आहे. त्यांच्या मते जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नीतीला प्रेरक व पोषक अशा रीतीने प्रत्येक माणसाने वागले पाहिजे. अर्थकारण, राजकारण, शिक्षण, व्यापार इत्यादी सर्व क्षेत्रात माणसाने शुध्द नैतिकता सांभाळून वागावे यावर त्यांनी भर दिला. याबाबतीत त्यांनी ना.गोपाळकृष्ण गोखले यांना गुरु मानले होते. ना.गोखले यांच्या मते मनुष्य हा नैतिक प्राणी आहे. नैतिकतेने परिपूर्ण जीवन हे त्याचे साध्य उद्दिष्ट आहे. राजकारण हे मानवी जीवनाचेच एक अंग असल्याने त्याला नैतिकतेपासून अलग करता येत नाही. ना.गोखले यांचे असे मत होते की, सार्वजनिक जीवनाचे आध्यात्मिकरण झाले पाहिजे म्हणजे सार्वजनिक क्षेत्रात असलेल्यांनी आपल्या वर्तणुकीसंबंधी निश्चित असे मूल्याधिष्ठित निकष तयार केले पाहिजेत. त्यांच्या पालनानेच सार्वजनिक जीवन शुध्द राहू शकते. म.गांधीजींनी या विचाराचा पुरस्कार केला.

म.गांधीजींच्या मते राजकीय क्षेत्रात साध्य व साधन या दोन्ही गोष्टीचे स्वरुप पवित्र असले पाहिजे. कारण मानवी जीवनास सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक अशा विविध क्षेत्रांत विभागता येत नाही. तसेच विशिष्ट अशा चौकटीत बांधता येत नाही. कारण ही सर्व क्षेत्रे एकमेकांशी निगडित असे आहेत. त्यांच्या निश्चित असा परस्पर संबंध आहे. या सर्वांचा संबंध मानवी जीवनाशी असल्याने त्यांच्यात विभाजन करणे योग्य नाही. एखादा व्यापारी वाममार्गाने मोठया प्रमाणात पैसा मिळवीत असेल आणि त्यातील काही धन देवधर्मावर खर्च करुन आपण पापमुक्त होऊ असा विचार करीत असेल तर तो स्वतःचीच फसवणूक करतोय असे म्हणता येईल. कारण माणसाचे दैनंदिन वर्तन, जीवन आणि चारित्र्य हे त्याच्या आध्यात्मिक स्वरुपापासून कधीही वेगळे करता येत नाहीत. तसेच साधन आणि साध्य यांनाही विभक्त करता किंवा समजता येत नाही. साधन हा साध्याचाच भाग असतो. म्हणून चांगलया आणि शुभ सांधनांचाच उपयोग व अवलंब करणे आवश्यक

असते. साधने जर गलिच्छ, हिंसात्मक व हिणकस वापरण्यात आली तर त्यांच्यामुळे चांगले, उच्च, आणि उदात्त साध्य खऱ्या अर्थाने कधीच प्राप्त होऊ शकत नाही. पेरावे तसे उगवते, हा सृष्टीचा नियम आहे. म्हणून ईश्वराची, शिवाची, मांगल्याची उपासना अशुध्द व असुरी मार्गाने करणे हे अज्ञानाचे व मुर्खपणाचे लक्षण असते.

म.गांधीजींनी असे म्हटले आहे की, सत्याप्रति असलेल्या माझ्या निष्ठेने मला राजकारणात येणे भाग पडले. माझी अशी धारणा आहे की, सामाजिक आणि नैतिकतेच्या प्रगतीच्या दृष्टीने राजकारण केले पाहिजे. भारताचे पारतंत्र्य हा भारताच्या नैतिक उन्नतीच्या मार्गातील एक प्रमुख अडसर आहे. म्हणूनच हा अडसर दूर करण्याच्या दृष्टीने मी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये सहभागी झालो. म.गांधीजी आवश्यकतेमुळे राजकारणात आले. ते मुख्यतः एक धार्मिक, धर्मपरायणवृत्तीचे गृहस्थ होते. त्यांचा पिंड एखाद्या धर्मगुरुसारखा होता. म.गांधींच्या विचारात प्रामुख्याने हिंदू धर्माची प्रतीके व परिभाषा असली तरी त्यांची धर्मनिष्ठा कोणत्याही विशिष्ठ धर्माच्या चौकटीत बसणारी नव्हती. विशिष्ट धर्माच्या आधारे राजकारण करणे त्यांना मान्य नव्हते. त्यांच्या धर्मकल्पनेत कोणताही पंथ, रुढी, कर्मकांड, अंधश्रध्दा यांना मुळीच स्थान नसे. त्यांचा धर्म प्रामुख्याने नैतिक आचराणातच सामावलेला असे. जो धर्म शुध्द नीतीला सर्वश्रेष्ठ स्थान देत नाही तो त्यांना मान्य नसे. म्हणूनच हिंदू धर्मात शेकडो वर्ष चालत आलेल्या अस्पृश्यतेला त्यांनी विरोध केला. धर्मात प्रामुख्याने पावित्र्य, शुध्दी व मांगल्य यांनाच महत्त्व असायला पाहिजे. असे त्यांचे मत होते. हिंदू धर्माप्रमाणे जैन, बौध्द, ख्रिश्चन आणि इस्लाम या सर्व धर्मांचा प्रभाव म.गांधीजींवर होता. एका अर्थाने त्यांनी सर्वधर्मसमभाव ही संकल्पना पुरस्कारली असे म्हणता येते. मात्र धर्मातील दोष आणि उणीवाही त्यांनी मान्य केल्या. हिंदू धर्माचे वारस असल्याचा त्यांना अभिमान होता त्यामूळेच हिंदू धर्माला विश्वव्यापक पेहराव चढविण्यासाठी ते प्रयत्न करीत व सत्यामध्ये सर्व धर्म अंतर्भूत करीत. मात्र राज्यपध्दती धर्मावर आधारलेली असावी हे त्यांना मान्य नव्हते. त्यांनी 'राम राज्य' या शब्दाचा प्रयोग केला तरी त्याचे स्वरुप धर्माधिष्ठीत नव्हते तर न्याय आणि नीतिमत्ता या तत्त्वावर आधारलेल्या राज्याचे होते. म.गांधीजींच्या मते नीती व धर्म हे एकाच अर्थाचे शब्द आहेत. धर्मशून्य नीतिनियम असलेले जीवन वाळूवर बांधलेल्या इमल्यासारखे आहे आणि नीतिरहित धर्म ही कवडी किंमतीची वस्तू आहे. आपले नैतिक अधिष्ठान सुटले की, आपण धार्मिक राहत नाही. नीतीची पायमल्ली करणारा धर्म असू शकत नाही. म.गांधींनी धर्माकडे कर्तव्य या भावनेने पाहिले. म्हणून त्यांनी धर्म आणि राजकारण यात फरक केला नाही. ते म्हणत की, माझे राजकारण हे माझ्या धर्माला पोषक आहे. मी राजकारणात दिसतो याचे कारण मला माझे आध्यात्मिक जीवन म्हणजेच सेवेचे जीवन राजकारणाच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे करणे शक्य होते. माझ्या धार्मिक जीवनाला जर राजकारणाचा प्रतिबंध होऊ लागला तर मी राजकारण सोडून देईन. धर्माशिवाय राजकारणाची मी कल्पनाच करु शकत नाही. राजकीय कार्य त्यांनी आपल्या मोक्षसाधनेचे एक साधन म्हणून वापरले.

अर्थकारणाचा विचार करीत असताना सुध्दा म.गांधींनी नैतिकतेचा पुरस्कार केला. त्यांच्या मते खरे अर्थशास्त्र म्हणजे न्यायाचे अर्थशास्त्र होय. जे अर्थशास्त्र द्रव्याची पूजा करण्यास प्रवृत्त करते आणि दुर्बलाचा बळी देऊन सबलांना द्रव्य संचय करण्यास समर्थ बनवते ते खोटे आणि उद्वेगजनक शास्त्र आहे. सामाजिक न्यायाचा पुरस्कार करणारे अर्थशास्त्रच योग्य होय. म्हणूनच त्यांनी विश्वस्तवृत्तीचा सिध्दान्त मांडला. हा विचारही ख्रिश्चन, जैन धर्मातील 'अपरिग्रह' तत्त्वाच्य, तसेच प्युरिटन धर्ममताच्या प्रभावातूनच त्यांनी मांडला होता.

संदर्भ :

१) नलिनी पंडित, गांधी, ग्रंथाली, मुंबई-१९९७
२) गांधी विचार दर्शन, धर्मविचार भाग १ व २, महात्मा गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे १९९४
३) डॉ.ग.ना.जोशी, महात्मा गांधी : विचारविमर्श, मॅजेस्टीक प्रकाशन मुंबई २००५.
४) रामजीसिंह, गांधी और मानवताका भविष्य, कॉमन वेल्थ, दिल्ली २०००.